"नवीन सुधारीत संशोधन आराखडा"

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव्यविद्या विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयात विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

★ संशोधन विषय ★

"हिंगोली जिल्हा सांस्कृतिक इतिहास विशेष संदर्भ (मंदीर, मठ व बारव) : एक ऐतिहासिक अभ्यास"

★ संशोधिका ★

पंडित किर्ती नारायणराव

एम.ए. एम.एड. (इतिहास), सेट

★ मार्गदर्शक ★

प्रा.डॉ. जी.पी. भालेराव

एम.ए., बी.एड., पीएच.डी.

तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान

महाविद्यालय, सेनगाव जि. हिंगोली

★ संशोधन केंद्र ★

ज्ञानोपासक शिक्षण मंडळ, परभणी संचलित

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

सन २०२१-२०२२

अनुक्रमाणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
१	विषयप्रवेश	१-२
२	संशोधनाचे महत्व	३
३	संशोधनाची उद्दिष्ट्ये	४
४	संशोधनाची गृहितके	५
५	संशोधन पध्दती	६
६	संशोधन आवश्यकता	७
७	संशोधन व्याप्ती	७
८	पुर्वसंशोधन आढावा	८
९	प्रकरण विभागणी	९-१२
१०	संदर्भग्रंथ सुची	१३-१४

विषय प्रवेश

जगभरात भारत हा देश महान प्राचीन संस्कृती असणारा देश मानला जातो. जगभरात ज्या काही प्राचीन महान संस्कृती आहेत ज्यामध्ये मग ती प्राचीन रोमन संस्कृती असो, इजिशियन संस्कृती असो किंवा प्राचीन मेसोपोटेमियन संस्कृती असो यांच्याप्रमाणेच भारत देशाला महान संपन्न 'हडप्पा संस्कृतीचा' वारसा लाभलेला आहे.

भारत देशाचाच एक भाग म्हणजे महाराष्ट्र राज्य होय. सांस्कृतिक दृष्टीने महाराष्ट्र हे अतिशय समृध्द राज्य आहे. प्राचीन महाराष्ट्रात अनेक जनपदे होती. यापैकी सातवान, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट इ. राजवटींनी आपापल्या परीने महाराष्ट्र संस्कृतीत सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, कला, स्थापत्य इ. सर्वच क्षेत्रात भरीव अशी कामगिरी करुन महाराष्ट्रात 'सांस्कृतिक समृध्दता' आणलेली आहे.

महाराष्ट्र राज्याचा एक अविभाज्य भाग म्हणजे 'मराठवाडा विभाग' होय. मराठवाडा विभाग हा 'ऐतिहासिक आणि सांस्कृतिक' दृष्टीकोनातून अतिशय संपन्न प्रदेश आहे. मराठवाडा विभागात 'हिंगोली' हा जिल्हा सांस्कृतिकदृष्ट्या वैविध्यपूर्ण व संपन्न जिल्हा आहे. हिंगोली जिल्हा हा प्राचीन वारसा लाभलेला आहे. यामध्ये पुरातन मंदिरे, मठ व बारव यांचा समावेश होतो. हिंगोली हा प्रथम निजामाच्या शासनामध्ये समाविष्ट होता.

निजामकाळातील लष्करी तळ म्हणून हिंगोली हे ठिकाण परिचित होते. हिंगोलीमध्ये लष्करी सैन्याची पशुवैद्यकीय, त्या काळी होते. हिंगोलीतील नागरिकांना १८०३ मध्ये टीपु सुलतान आणि मराठा यांच्या मधील दोन युध्दांचा थरार येथील रहिवासीयांसाठी अनुभवला आहे. तसेच १८५७ मध्ये नागपुरकर आणि भोसले लष्करी आधारावर हे शहर हैद्राबाद राज्यातील एक खूप महत्वाचे प्रसिध्द असे ठिकाण होते.

हिंगोली शहरातील आजही पुरातन गल्लीची नावे दिसून येतात. ज्यामध्ये पलटन, रिसाला, तोफखाना, पेन्शनपुरा, सदर बाजार, ट्रेझरी ऑफिस जुने, पोस्ट ऑफिस यांचा प्रामुख्याने समावेश होताना दिसून येतो.

कालांतरानंतर ब्रिटीशांच्या वर्चस्वातुन मुक्त झाल्यानंतर १९५६ मध्ये स्वातंत्र्यानंतर मराठवाड्याची निर्मिती करण्यात आली. त्यावेळी मुंबईला राज्याला जोडण्यात आले. १९६० मध्ये परभणी जिल्ह्याल हिंगोली जोडण्यात आल्यानंतर हिंगोली हा महाराष्ट्र राज्याचा एक

महत्त्वाचा भाग बनला तसेच १ मे १९९९ रोजी परभणी जिल्ह्यातून हिंगोली या जिल्ह्याची स्वतंत्र निर्मिती केल्यानंतर हिंगोली जिल्हा अस्तित्वात येऊन हिंगोली चे महत्त्वव कार्य स्वतंत्रपणे सुरु झाले.

हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर त्यात पाच तालुक्यांचा समावेश झाला. त्यात हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ आणि वसमत ह्या तालुक्यांना समाविष्ट करण्यात आले तसेच दैनंदिन व प्रशासकीय कार्यालयीन कामकाज सुनियोजित पध्दतीने पार पाडण्यात येऊ लागली.

ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने विचार केला तर हिंगोली जिल्हा या दृष्टीने अतिशय समृध्द व संपन्न जिल्हा आहे. हिंगोली जिल्ह्याने प्राचीन ते आधुनिक स्तरावर आपल्या जिल्ह्याची स्वतंत्रपणे ओळख निर्माण केलेली दिसते. प्राचीन दृष्टीने विचार करता हा पर्यटन स्थळ, मठ, मंदीरे, बारव या सर्वाच्या अनुषंगाने सांस्कृतिक क्षेत्रात अतिशय संपन्न व भरभराटीचा आहे.

हिंगोली जिल्ह्यात 'औंढा नागनाथ' हे ण्क गाव व तालुका आहे. 'आमर्दकपुर' हे ज्योतिर्लिंग क्षेत्र आहे. आमर्दक या प्राचीन नावाने परिचित आहे. ही एक शिवाची उपाधी असून या नावाचा एक शैवपंथही अस्तित्वात होता. हे भारतातील पवित्रा बारा ज्योतिर्लिगापैकी आद्य मानले जाते. याप्रमाणेच हिंगोली जिल्ह्यात नरसी नामदेव , श्रीजलेश्वर मंदीर, श्री गजानन महाराज मंदीर, श्री दत्त मंदीर, श्री शांतीनाथ जैन श्वेतांबर मंदीर, खटकाळी हनुमान मंदीर अशी अनेक मंदीरे सांस्कृतिक जिवनाचा अभिन्न भाग आहे. तसेच श्री खाकीबुवा मठ व प्राचीन वास्तूंचा वारसा हिंगोली जिल्ह्याला आहे. या सर्वांचा सविस्तर आढावा या संशोधन विषयातून घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधनाचे महत्व

एखाद्या ठिकाणाची जर संपूर्ण ओळख मिळवायची असेल तर त्यासाठी त्या ठिकाणाची सखोल व विस्तृत माहिती प्राप्त करणे अगत्याचे ठरते. हिंगोली हा जिल्हा ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टीने फार मोठा वारसा असलेला दिसतो. या जिल्ह्यात पाच तालुक्यांचा समावेश होतो. हिंगोली, कळमनुरी, सेनगांव, औंढा नागनाथ व बसमत. यापैकी प्रत्येक तालुक्यात अनेक प्राचीन मंदीरे आहेत. मठ व बारव आहेत जे की ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचे ठरतात.

या ठिकाणी अनेक समारंभ, सण मोठ्या उत्साहात साजरे केले जातात. 'दसरा' हा येथील महोत्सव भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा प्रसिध्द महोत्सव आहे. दुरदुरच्या जिल्ह्यातील, तालुक्यातील लोक 'दसरा' महोत्सवासाठी हिंगोली जिल्ह्यात येतात. या महोत्सवाला सुमारे दिडशे वर्षाची परंपरा लाभलेली आहे. हिंगोलीच्या दसऱ्याची देशपातळीवर दखल घेतली जाते. विजयादशमीच्या शुभ पर्वावर हा प्राचीन व प्रदीर्घ परंपरा हा हिंगोली जिल्ह्याच्या सांस्कृतिक जिवनाचा महत्त्वाचा भाग आहे. हिंगोलीच्या दसऱ्याला लोकाश्रय मिळाला आहे. हा लोकाश्रय इतका उदार आहे की भारतातील प्रथम क्रमांकाचा म्हैसुरचा जो 'दसरा' आहे. त्याला जगभरात क्रमांक पहिला असला तरी त्यापाठोपाठ हिंगोली जिल्ह्याचा क्रमांक लागतो. ही प्रत्येक हिंगोली रहिवाशांसाठी अभिमानाची बाब आहे.

याचप्रमाणे येथे संत नामदेव महाराज, विठोबा खेचर, संत जनाबाई यांच्या वास्तव्याने पावन झालेली ही भूमी अनेक दृष्टीने धार्मिक क्षेत्रात खूप संपन्न आहे. यात श्री कानिफनाथ गड, खैरी घुमट, सिध्दनाथ मंदीर, मल्लिनाथ दिगंबर जैन मंदीर, बौध्द स्तूप, समगा येथील संमेश्वर, महादेव मंदीर इ. मंदीरांचा समावेश होतो.

दसऱ्याबरोबरच येथे नवदुर्गा महोत्सव, नागपंचमी, हत्ता नाईक ता. सेनगांव येथील कावड आगमन, भीम जयंती साजरे केले जातात. या जिल्ह्यातील गोंधळ, शाहिरी, भारुड, पोतराज, कलगीतुरा या प्रसिध्द व ऐतिहासिक प्रसिध्द लोककला आहेत. त्यामुळेच या सर्वांचा सविस्तर आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

या संशोधन विषयातून ते प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधनाची उद्‌दिष्ट्ये

१) हिंगोली जिल्ह्याचा ऐतिहासिक आढावा घेणे.

२) हिंगोली जिल्ह्यातील धार्मिक मंदीरांचा आढावा घेणे.

३) हिंगोली जिल्ह्यातील धार्मिक मठांचा अभ्यास करणे.

४) हिंगोली जिल्ह्यातील गढी, बारव व दर्गे यांचा धार्मिक दृष्टीकोणातुन सखोल अध्ययन करणे.

५) हिंगोली जिल्ह्याचा सांस्कृतिक दृष्टीने अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

१) हिंगोली जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा प्राप्त झालेला आहे.

२) हिंगोली जिल्ह्यातील तालुक्यात अनेक प्रसिध्द मंदीरे आहेत.

३) हिंगोली जिल्ह्यात अनेक प्राचीन मठांचा समावेश होतो.

४) हिंगोली जिल्ह्यात अनेक ऐतिहासिक दृष्टीकोनातुन महत्त्वाचे गढी, बारव व दर्गे आहेत.

५) हिंगोली जिल्ह्याला सांस्कृतिक समृध्द वारसा प्राप्त झालेला आहे.

संशोधन पध्दती

"हिंगोली जिल्हा सांस्कृतिक इतिहास विशेष संदर्भ (मंदिरे, मठ व बारव) : एक ऐतिहासिक अभ्यास" प्रस्तुत संशोधन विषयासाठी ऐतिहासिक विश्लेषणात्मक पध्दत संदर्भ संशोधन पध्दत यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच यासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात येणार आहे.

प्राथमिक साधने

या संशोधन विषयासाठी पुरातत्वीय साधने, अभिलेख, स्मारके, अवशेष तसेच अनेक ग्रंथ यांचा उपयोग करण्यात येणार आहे.

दुय्यम साधने

या संशोधनासाठी दुय्यम साधनांमध्ये हिंगोली जिल्ह्याचा इतिहासावर प्रकाश टाकणे, ग्रंथ, अप्रकाशित साधने, वृत्तपत्रे, लेख, इंटरनेट इ. चा आधार घेण्यात येणार आहे.

संशोधन आवश्यकता

या संशोधन विषयाची आवश्यकता यासाठी आहे की, हिंगोली हा जिल्हा मराठवाडा विभागाच्या उत्तरेस आहे. त्याला ऐतिहासिक व सांस्कृतिक क्षेत्रात अतिशय संपन्न इतिहास प्राप्त झालेला आहे. सुरुवातीच्या काळात निजामाच्या ताब्यात असणाऱ्या हिंगोली जिल्ह्याने प्राचीन काळापासूनच आपली स्पष्ट व वेगळी ओळख कायम ठेवलेली आहे. १ मे १९९९ ला स्वतंत्र झालेला हा जिल्हा पर्यटन क्षेत्रात पर्यटकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू म्हणून ओळखला जातो. कारण येथील औंढा नागनाथाचे मंदीर हे भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी आद्य (आठवे) ज्योतिर्लिंग आहे. त्यामुळे अनेक लोक दर्शनासाठी दरवर्षी येथे यात्रा करुन येतात. येथील दसरा महोत्सवाला दिडशे वर्षाची परंपरा लाभलेली आहे. त्यामुळेच हिंगोली जिल्ह्यातील मंदीरे, मठ, उत्सव याचा सविस्तर आढावा घेणे आवश्यक आहे. म्हणून या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधन व्याप्ती

"हिंगोली जिल्हा सांस्कृतिक इतिहास विशेष संदर्भ (मंदिरे, मठ व बारव) : एक ऐतिहासिक अभ्यास" या संशोधनाविषयाची व्याप्ती ही हिंगोली जिल्ह्यातील पाच तालुके हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ व वसमत इ. पुरती मर्यादीत आहे.

पूर्व संशोधन आढावा

हिंगोली जिल्ह्याच्या दृष्टीने विचार केला तर ऐतिहासिक काळाच्या प्रारंभी भारतात जी सोळा महाजनपदे अस्तित्वात होती. 'हिंगोली जिल्हा' या दृष्टीने काही शोध प्रबंध झाले आहेत. परंतु यात "परभणी व हिंगोली" या दोन्हीच्या हिशोबाने अभ्यास करण्यात आला आहे

मात्र हिंगोली जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास विशेष संदर्भ म्हणून मंठ, मंदीरे व बारव या दृष्टीने सखोल अध्ययन झाल्याचे दिसत नाही. या संशोधन विषयात हिंगोली जिल्हा सांस्कृतिक, मठ, मंदीरे व बारव यांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

हिंगोली व परभणी यांचा विचार करुन अनेक समग्र लेख या दोहोंच्या बाबतीत लिहिले गेले आहेत. त्यात केवळ हिंगोली जिल्ह्याच्या स्वतंत्र दृष्टीने लेखन फारसे झालेले दिसत नाही. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ व वसमत इ. तालुक्यातील मंदीर, मठ, बारव व गढी या दृष्टीने बारकाईने विश्लेषण झाल्याचे दिसत नाही. या प्रस्तुत संशोधनातून हे कार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रकरण विभागणी

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रकरण विभागणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

१) ऐतिहासिक पार्श्वभूमी

या पहिल्या प्रकरण हिंगोली जिल्ह्याचा ऐतिहासिक दृष्टीने विचार करण्यात येईल. हिंगोली हा मराठवाडा विभागाचा एक प्रादेशिक भूभाग आहे. फरिश्ताच्या 'तारिखे फेरिश्त्ता' या ग्रंथात मराठवाड्याचा उल्लेख झाला आहे. तसेच टिपू सुलतानचा इ.स. १७५३ ते १७९९ या दरम्यानच्या पत्रातून मराठवाड्याचा 'मरहटवाडी' असा संदर्भ येतो. पुढे या नावाचे 'मराठवाडा' असे रुपांतर झाले. या मराठवाडयात हिंगोली जिल्ह्याचा समावेश होतो. मराठवाड्यातील ऐतिहासिक व सांस्कृतिक इतिहासाचा हिंगोली जिल्हा साक्षीदार आहे. हिंगोली जिल्ह्याने निजामाची सत्ता अनुभवलेली, लश्करी ठिकाण म्हणून आपली ओळख जपलेली दिसते. या प्रकरणात हिंगोली जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहण्यात येईल.

२) हिंगोली जिल्ह्यातील मंदीर

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यात समाविष्ट असणाऱ्या मंदीराचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. या ठिकाणी संत नामदेवाचे मंदीर आहे. हे १३ व्या शतकातील संत नामदेवांचे जन्मस्थान असलेल्या नरसी नामदेव गावात आहे. या प्रसिध्द वारकरी संताचा जन्म १२७० साली झाला आणि त्यांनी अनेक लोकांना मदत केली. देव सर्वव्यापी आहे. ज्ञानेश्वर आणि विसोबा खेचर या गुरुंकडुन त्यांनी अनेक गोष्टी शिकुन घेतल्या. हे ठिकाण धार्मिक केंद्र असून संपर्ण भारतातून भाविक या ठिकाणी येतात.

तसेच औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापुर गावात जैन समाजातील सर्वात ऐतिहासिक मंदीरापैकी एक आहे. येथे सुमारे ३०० वर्ष जुनी मल्लिनाथची मूर्ती आहे. या मंदीराच्या स्थापनेची पौराणिक कथा आहे. वर्षापूर्वी अर्धापूर येथे मूर्तीची स्थापना करण्यात आली होती. ही मूर्ती कारंजा येथे नेण्यासाठी त्यांनी निजामाकडे परवानगी मागितली. निजामाने त्यांना ही मूर्ती कारंजा येथे नेण्याची परवानगी दिली. शिरडशहापूर येथे नंतर मूर्तीची स्थापना केली. आता भारतभरातील यात्रेकरुंसाठी भाविक लोकांसाठी, जैन धर्मासाठी हे अतिशय प्रसिध्द ठिकाण आहे. तसेच औंढा नागनाथ येथील ज्योतिर्लिंग हे एकुण बारा

ज्योतिर्लिंगापैकी आठवे (आदय) आहे. त्यामुळे भारतातील भाविक लोक औंढा नागनाथ येथे श्रावण महिन्यात नेहमी दर्शन घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.

या सर्वांची हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ व वसमत येथील सर्व मंदीरांचा सखोल असा आढावा घेण्यात येईल.

३) हिंगोली जिल्ह्यातील मठ

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील मठांची सखोल माहिती घेण्यात येईल. यापैकी वसमत तालुक्यात थोरला मठ संस्थान मठ, हे एक प्राचीन धार्मिक व दर्शनीय स्थळ आहे. ही एक उज्जयनी धर्म सिंहान नंदी गोत्रीय अंतर्गत असणारी दारुक शाखा आहे. या मठाचे मूळ पुरुष श्री गुरु प.ब्र. १०८ शम्भूलिंग शिवाचार्य होत. यांच्यानंतर मठाच्या पवित्र गादीवर अनेक तपस्वी महायोगी सिध्द पुरुष होऊन गेले. हे त्यामध्ये ११ वे गुरुवर्य लि. शिवश्री गुरु दिंगबर शिवाचार्य महाराज एक अवलिया महापुरुष होते. त्यानंतर वर्तमान मठाधिपती श्री गुरु शिवाचार्य महाराज समर्थपणे मठाची परंपरा सांभाळत आहेत. हा मठाव्या माध्यमातून धार्मिक, राष्ट्रीय व सामाजिक कार्य सुरु आहेत. तसेच महाराष्ट्रात हा मठ संस्थान हे धर्म जागृतीचे केंद्र म्हणून नावारुपाला आले आहे. याप्रमाणेच हिंगोली जिल्ह्यात खाकीबाबा मठ असून हे सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात समाजप्रबोधनाचे कार्य केले जाते. खाकीबाब मठाव्दारे धार्मिक उपक्रम राबविले जातात. रामनवमी उत्सव हिंगोली शहरामध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. तसेच दसऱ्याचे रावणदहण या मठाच्या प्रांगणात पारंपारिक पध्दतीने केले जाते. तसेच हिंगोली शहरात दसरा महोत्सव मोठ्या उत्साहात आयोजित केला जातो. भाविक लोकांसाठी पुरातन काळापासून हे तीर्थक्षेत्र म्हणून प्रसिध्द आहे. या मठाप्रमाणेच हिंगोली जिल्ह्यातील इतर तालुक्यातील असणाऱ्या मठांची माहिती घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केला जाईल.

४) हिंगोली जिल्ह्यातील बारव व दर्गे

हिंगोली जिल्ह्यातील बारव व दर्गे या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील प्राचीन व सांस्कृतिक तसेच ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे बारव व दर्गे यांचा शोध घेण्यात येणार आहे.

बारव म्हणजेच विहीर किंवा तलाव ज्यामध्ये पाण्याच्या पातळीपर्यंत पायऱ्या उतरुन पाणी पोहचते. ते बहुमजली असू शकतात. ज्यात एक बैल पाण्याचे चाक फिरवुन विहीरीचे

पाणी पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर वाढवतो. ते पश्चिम भारतात सर्वात सामान्य आहेत आणि भारतीय उपखंडातील इतर अधिक रखरखीत प्रदेशामध्ये देखील आढळतात. बारव याला स्थानिक रहिवाशांव्दारे वेगवेगळी नावे आहेत. बौडी, बावरी, बाओरी, गुजराती आणि मारवाडी भाषेत त्यांना सहसा 'वाव' म्हणतात. इतर नावांमध्ये कन्नड या स्थानिक प्रदेशात पुष्करणी म्हणतात, १४ व्या शतकात अग्रेसन योन पुनर्निमित पाण्याची खात्री करण्यासाठी 'बारव' चा उगम झाला. हिंगोली जिल्ह्याच्या संदर्भाने सेनगाव तालुक्यात 'वरुड चक्रपान' येथे बारव उपलब्ध आहे. इतर तालुक्यांच्या दृष्टीने माहिती मिळविली जाईल व प्रस्तूत संशोधनात समाविष्ट केली जाईल.

'बारव' प्रमाणेच या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील दर्ग्यांचा आढावा घेण्यात येईल हिंगोली जिल्ह्यातील 'चिराग सावली' हा दर्गा अतिशय प्रसिध्द आहे. हिंगोली शहरातील रिसाला बाजार भागात असलेल्या 'सिरेहक शहा बाबा' दर्गाह' सर्वदूर प्रसिध्द आहे. दरवर्षी या ठिकाणी संदल मिरवणुकीसाठी जिल्ह्यासह बाहेर गावावरुन भाविक येतात. दर्गा परिसरात आल्यानंतर बाबांच्या आठवणींना उजाळा दिला जातो. येथे हा दर्गा अतिशय प्राचीन काळापासून आहे. सर्वच धर्मातील लोक या मोठ्या श्रध्देने येथे येतात. याठिकाणी दरवर्षी विविध धार्मिक कार्यक्रम राबविले जातात. त्याचप्रमाणे कळमनुरी तालुक्यातही दर्गा आहे. याप्रमाणे हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, औंढा नागनाथ व वसमत येथील प्रसिध्द दर्ग्यांचा आढावा घेऊन प्रस्तूत संशोधन विषयात विस्तृत व ऐतिहासिक दृष्टीने त्याची माहिती देण्याचा प्रयत्न केला जाईल.

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्यातील ऐतिहासिक, प्राचीन, सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाचे 'बारव' व 'दर्गे' यांचा सपूर्ण आढावा घेऊन प्रस्तूत प्रकरणात माहिती सादर करण्यात येईल.

५) हिंगोली जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास

या प्रकरणात हिंगोली जिल्ह्याचा सांस्कृतिक इतिहास सखोल अभ्यासण्यात येणार आहे. यात समाजजीवन, सण समारंभ, परंपा यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

येथील 'दसरा' हा महोत्सव मोठ्या उत्साहाने दरवर्षी साजरा करण्यात येतो. याला दिडशे वर्षाची परंपरा लाभलेली आहे. ही 'म्हैसूर' पाठोपाठ भारत देशातील दुसऱ्या क्रमांकाची यात्रा मानली जाते. दसऱ्याला मोठ्या प्रमाणात लोकांची पसंती लाभलेली आहे. याला पारंपारिक दृष्ट्या व हिंगोली जिल्ह्याच्या सांस्कृतिक संपन्नतेत खूप भर टाकलेली आहे.

'हिंगोलीचा दसरा' ही हिंगोलीची फार मोठी ओळख म्हणून समोर आलेली आहे. नर्सी नामदेव येथे शिख धर्मियांचा गुरुद्वारा आहे. अनेक भाविक भक्त येथे दर्शनासाठी येतात. हिंगोलीच्या सांस्कृतिक इतिहासात यांना फार मोठे महत्त्व आहे. येथे बौध्द धर्मिय लोक बौध्द पौर्णिमा, भीम जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करतात. तसेच जैन धर्मिय महावीर जयंती मोठ्या प्रमाणात साजरी करतात. लोकजागृती करण्यासाठी अनेक वेळा पथनाट्ये साजरी केली जातात. याव्दारे सामाजिक प्रबोधन करण्यात येते. तसेच आषाढी एकादशीसाठी दरवर्षी पंढरपुरला पालखी निघते, हा हिंगोली जिल्ह्याच्या सांस्कृतिक इतिहासाचा भाग आहे. अनेक शैक्षणिक संस्था जसे आदर्श महाविद्यालय, सेनगाव येथील तोष्णीवाल महाविद्यालय, औंढा नागनाथ येथील नागनाथ महाविद्यालय, वसमत तालुक्यातील बहिर्जी महाविद्यालय हे देखील सांस्कृतिक इतिहासाचा भाग आहे. तसेच येथे किर्तने, भजने हे होत राहतात. या सर्वांचा या प्रकरणात सविस्तर आढावा घेण्यात येईल.

६) निष्कर्ष

हे प्रस्तुत संशोधन विषयाचे अंतीम प्रकरण आहे. यामध्ये सदरच्या संशोधनात प्राप्त झालेले निष्कर्ष मांडले जातील व योग्य त्या ठिकाणी छायाचित्रे, आराखडे जोडले जातील तसेच योग्य त्या ठिकाणी परिशिष्ट्ये यांचा तसेच संदर्भग्रंथ देण्यात येतील. योग्य त्या शिफारशी केल्या जातील.

संदर्भग्रंथ सूची

१. डॉ. भापकर पुरुषोत्तम, अग्रेसर मराठवाडा, आदित्य प्रकाशन.
२. पेंडसे रा.द., महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, नागपूर, १८३१
३. भुसारी र.म., प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, १९६५.
४. पाठक अरुणचंद्र श., मराठवाडा- एक सांस्कृतिक मागोवा, विद्या बुक्स पब्लिशर्स- २०१९.
५. अग्निहोत्री द.ह., महाराष्ट्र संस्कृतीचे तात्वीक अधिष्ठान, पुणे १९८९.
६. प्रा. डॉ. अत्रे शुभांगण, महाराष्ट्र संस्कृती, डायमंड पब्लिकेशन, प्रथम आवृत्ती, पुणे, २००४.
७. कर्वे इरावती, मराठी लोकांची संस्कृती, पुणे, देशमुख ॲण्ड कंपनी १९६२.
८. डॉ. कठारे अनिल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.
९. डिकळसर, द.बा., महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास आणि संस्कृती, पुणे, विद्यापीठ प्रकाशन १९६४.
१०. पाठक अरुणचंद्र श., महाराष्ट्रातील बारव- स्थापत्य आणि पारंपारिक जलव्यवस्थापन, अपरात प्रकाशन
११. डॉ. भापकर पुरुषोत्तम, अग्रेरसर मराठवाडज्ञ, आदित्य प्रकाशन
१२. जिल्हा नकाशा हिंगोली
१३. आगलावे प्रदीप, सामाजिक संशोधन पध्दती व तंत्रे, श्रीनाथ प्रकाशन, नागपुर.
१४. सुर्यवंशी सेतु, हैद्राबाद मुक्तीसंग्राम, सांगवी प्रकाशन, नांदेउ- १९८५.
१५. कुरुंदकर नरहर, हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन सपा, प्रा.द.प.जोशी मराठी साहित्य परिषद: आंध्रप्रदेश हैद्राबाद.
१६. पटवर्धन विश्वनाथ अनंत, संस्थानातील लोकशाहीचा लढा, संस्थानी स्वराज्य, १.. अ सदाशिव पेठ, पुणे - १९८०.
१७. प्रा. मोरे, प्रा. भांबरे, प्रा. घाडगे, प्राचीन भारताचा इतिहास
१८. प्रा. शेणोलीकर ह.श्री. व डॉ. देशपांडे प्र.न., महाराष्ट्राचा सामाजिक व सांस्कृतिक इतिहास, के सागर पब्लिकेशन, पुणे - १९०६.
१९. डॉ. कठारे अनिल, प्राचीन भारताचा इतिहास (प्रारंभ ते १३१८), प्रशांत पब्लिकेशन.
२०. तुळवुळे श.गो., लीळाचरित्र एकांक, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपुर, पुणे, पहिली आवृत्ती १९६४.
२१. बिंदू दि.गो., हैद्राबाद राज्याचे विसर्जन, साकेत प्रकाशन, औरंगाबाद

२२. प्रा. शिंगारे अनिल गणपतराव, दक्षिण भारताचा इतिहास, अरुणा प्रकाशन, लातुर.
२३. प्रा. पाटील व्ही.बी., महाराष्ट्राचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन्स.
२४. डॉ. बिराजदार संजय, प्राचीन व मध्ययुगीन भारताचा इतिहास (कला संस्कृतीच्या विशेष संदर्भासह), ज्ञानदीप प्रकाशन.
२५. डॉ. सिंगारे अनिल, प्राचीन भारताचा इतिहास (इ.स. ६४७ पर्यंत), अरुणा प्रकाशन लातुर.

वृत्तपत्रे लेख

१) दै. लोकमत
२) दै. सकाळ
३) दै. लोकसत्ता लेख
४) दै. पुण्यनगरी लेख
५) टाईम्स ऑफ इंडिया

गॅझेटिअर

६) मराठवाडा स्वातंत्र्य सैनिक, महाराष्ट्र स्टेट गॅझेटिर, परभणी १९६७.
७) महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर १९९४.

वेबसाईट

८) https://hingoli.nic.in/
९) **https://en.wikipedia.org/wiki/Hingoli**

संशोधक विद्यार्थी
पंडित किर्ती नारायणराव
ज्ञानोपासक शिक्षण मंडळ, परभणी
संचलित कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, परभणी

मार्गदर्शक
प्रा.डॉ. जी.पी. भालेराव
तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, सेनगाव, जि. हिंगोली